

धनुष्य'मधील पर्यावरणविषयक प्रयोगशाळा.

# रजे मुख्य रस्त्याचे
# ीकरण रखडलेलेच!

ीच्या हद्दीतील मुख्य
रण अद्याप रखडले
ी या रस्त्यावरील
पादचारी मार्ग,
बसथांब्यांची कामे
. रस्त्यालगतच्या
ळे वारजे माळवाडीतील
ला वेठीस धरले जात
पालिकेच्या भूमिकेमुळेही
ी पिळवणूक होत आहे.



(Sakaal Marketing

कोथरूड परिसर

प्रतिबिंब

सकाळ
पुणे, गुरुवार
२४ जून २०१

# वारजेकरांचा धान्ययज्ञ...

राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्थेतर्फे २००२ मध्ये मुळशी तालुक्यात शिळेश्वर व माले येथे डोंगरदऱ्यात राहणाऱ्या मुलांसाठी वसतिगृह सुरू करण्यात आले. वारज्यात राहणारे सुधाकर देशपांडे यांनी 'प्रभात' विभागातील ज्येष्ठ नागरिकांची सहल या वसतिगृहावर नेण्याची योजना आखली. त्यानुसार एका सहलीचे आयोजन करण्यात आले. वसतिगृहातील मुले बघितल्यावर व तेथील अडचणी समजावून घेतल्यावर वसतिगृहासाठी कोणत्या प्रकारची मदत करता येईल, याविषयी विचारणा केल्यावर त्यांना नियमितपणे धान्याची गरज भासत असल्याचे सांगितले. हा विषय सहज जमू शकेल, असे सर्वांना वाटले. त्यानुसार मार्च २००३ पासून धान्यसंकलन सुरू झाले.

दर महिन्याच्या १० तारखेस हे धान्य संकलित करावे व संस्थेच्या एक- दोन कार्यकर्त्यांनी ते घेऊन यावे असे ठरवण्यात आले. त्या काळात वारजे येथील श्रीराम सोसायटीच्या मैदानावर शाखेत ही सगळी मंडळी येत असत. २०-२५ ज्येष्ठ नागरिकांचा हा गट धान्यसंकलन करू लागला. जयंतराव बापट, त्र्यंबकराव आपटे, लोहकरे, पटवर्धन, सुधाकर देशपांडे हे आपापल्या सोसायटीतून हे धान्य संकलित करू लागले.

या योजनेचे 'एक मूठ धान्य योजना/ शिवामूठ ... घरी आणून द्यावे असा हा विचार. प्रत्यक्ष महिन्यात १ ते दीड किलो धान्य घराघरांतून प्लॅस्टिक पिशव्यातून एकत्र होऊ लागले. संकलन करणाऱ्या ज्येष्ठ नागरिकांना एक कापडी पिशवी देण्यात आली व त्यात हे धान्य संकलित करून नेण्याची योजना सुरू झाली.

हळूहळू या उपक्रमाची व्याप्ती वाढू लागली व त्यातून सिद्धकला सोसायटी, दत्तदिगंबर सोसायटी येथेही शाखा सुरू झाल्या. संपर्क वाढत गेला व २०-२५ घरांपासून सुरवात करून आज ७ वर्षांनंतर या योजनेची व्याप्ती सहज १५० घरांपर्यंत पोचली.

सध्या हे संकलन वारज्यात ८-१० ठिकाणी करण्यात येते. श्रीराम सोसायटीत लोहकरे, देशपांडे, मिराशी यासाठी काम करतात. चैतन्यनगरी व अभिमान ग्राम येथे सुधाकर देशपांडे व श्रीमती विसाळ यांच्याकडे धान्य संकलित होते.

मोहन ठेकेदार यांच्याकडे योगासनवर्गात येणारे ज्येष्ठ नागरिक धान्य गोळा करून देतात. पॉप्युलरनगर येथील पारुंडेकर वहिनी गीताधर्म मंडळाच्या माध्यमातून या योजनेसाठी कार्यरत आहेत. आनंद कॉलनीत राहणारे जयंतराव बापट तर या योजनेचे आधारस्तंभ आहेत. तपोवन सोसायटीत राहणारे श्री. पटवर्धन सर्व सोसायटीतून निधीसंकलन करून त्यातून एक तेलाचा डबा व ... तांदूळ- गहू- डाळी- ज्वारी- बाजरी अशी ... होत असतात व त्यातून ७० ते ७५ टक्के ... पूर्तता होते.

दर महिन्याच्या १० तारखेस 'श्रेयस ... श्री. चिंतामणी (मणी) चितळे आपले वा... धान्यसंकलनासाठी देतात. संस्थेच्या वस... शिकून नोकरीस लागलेला संतोष केसवड... वर्षे दर महिन्याच्या १० तारखेस आपले... व्यवधाने सांभाळून धान्यसंकलनाच्या क... घोटावडे येथून येतो व ३ तास काम कर... जातो. गेल्या २ वर्षांपासून निवे गावचा ... हा माजी विद्यार्थीसुद्धा या योजनेत प्रत्यक्ष ... सहभागी होत आहे. एका लहानशा सह... झालेला हा उपक्रम वारज्याचे बरेचसे क्षे... आहे. सातत्याने गेली ७ वर्षे हा धान्यय... ज्येष्ठ नागरिक करत आहेत व त्यातून व... धान्य गरज पूर्ण होत आहे. ज्येष्ठ नागरि... वयाच्या ७० वर्षांच्या आयुष्यानंतरही ... समाजाची/गरजू विद्यार्थ्यांची गरज भाग... गरज आहे ती अशा समाजाच्या गरजा ... त्या पूर्ण करण्यासाठी शांतपणे कार्य कर... वारजेकरांचा धान्ययज्ञ हे त्याचे उत्तम ... शकते.

**प्रा. अनिल व्यास**